# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 15 October 2026
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ दुपारी १.०० वा.**

****

राज्य मार्ग परिवहन  – एसटी महामंडळाने दिवाळी निमित्त घेतलेला हंगामी १५ टक्के भाडेवाढीचा निर्णय रद्द केला आहे. १ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत प्रवासी भाड्यात सरसकट १५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव एसटी प्रशासनाने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे सादर केला होता. मात्र, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या जनतेवर आणखी भार टाकणं योग्य नसल्याची भूमिका घेत त्यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. हे शासन संवेदनशील असून, संकटाच्या काळात शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला वाऱ्यावर सोडणार नाही, असं मंत्री सरनाईक म्हणाले.

****

देशाचे अकरावे राष्ट्रपती आणि भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची आज जयंती. ‘मिसाईल मॅन’ म्हणून ओळखले जाणारे डॉ. कलाम यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या उल्लेखनीय योगदानाच्या बळावर देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत मजल मारली. देशाच्या पहिल्या स्वदेशी उपग्रह प्रक्षेपकापासून ते अग्निबाण कार्यक्रम आणि पोखरण अणुचाचणीपर्यंत त्यांनी देशाच्या वैज्ञानिक प्रगतीत मोलाची भूमिका बजावली. डॉ. कलाम यांची जयंती महाराष्ट्रात वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरी केली जाते. यानिमित्त राज्यातल्या शाळा, महाविद्यालयं आणि ग्रंथालयांमध्ये विविध विशेष कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

गृहमंत्री अमित शाह यांनी कलाम यांना आदरांजली वाहिली. डॉ. कलाम यांनी आपल्या असामान्य वैज्ञानिक प्रतिभेचा उपयोग भारताला एक प्रमुख सामरिक शक्ती बनवण्यासाठी केला, असं शाह यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून लडाखमधल्या सुमारे तीन हजार ३५० कोटी रुपये खर्चाच्या पाच प्रमुख विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि लोकार्पण होत आहे. लेह इथल्या कुशोक बकुला रिम्पोची विमानतळाच्या नव्या प्रवासी टर्मिनल इमारतीचं उद्घाटन, निम्मू-पदुम-दारचा रस्त्याचं राष्ट्रार्पण, आणि लेहमधल्या सिंधू घाट इथं भारताच्या पहिल्या पेट्रोग्लिफ अर्थात कातळचित्र संवर्धन उद्यानाचं उद्घाटन पंतप्रधानानांच्या हस्ते करण्यात येत आहे.
दरम्यान, पंतप्रधान आज नवी दिल्लीतल्या मेजर ध्यानचंद राष्ट्रीय मैदानात आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय खेळाडूंच्या पथकाची भेट घेणार आहेत.

****

सरकारनं साखर वितरकांना लागू असलेली साखरसाठ्याच्या कालावधीची मर्यादा कमी केली आहे. त्यानुसार वितरकांना आता १५ दिवसच साखरेचा साठा करता येणार आहे. वितरकांसाठी साठा ठेवण्याची मर्यादाही एक हजार क्विंटल निश्चित करण्यात आली आहे. हा निर्णय आजपासून लागू होत असून तो या वर्षी नोव्हेंबरपर्यंत लागू राहील. साठेबाजी रोखण्यासाठी आणि सणासुदीच्या काळात ग्राहकांना सुरळीत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी सरकारनं साखर साठा ठेवण्याच्या नियमांमध्ये सुधारणा केली आहे.

****

पुण्यातल्या ईएसआयसी रुग्णालयाला संलग्न वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल याबाबतची घोषणा केली. यानुसार २०२७-२८ या वर्षापासून ५० विद्यार्थी संख्येसाठी हे महाविद्यालय सुरू होणार आहे. या निर्णयाबद्दल फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांचे आभार मानले.

****

हिंगोली जिल्ह्यात आज पुन्हा भूकंपाचा धक्का बसला. आज पहाटे ४ वाजून ५८ मिनीटांनी वसमत तालुक्यातल्या खापरखेडा परिसरात भूगर्भातून आवाजासह सौम्य धक्का जाणवला. २ पुर्णांक ९ रिश्टर स्केल इतकी या भुकंपाची तिव्रता होती. प्राथमिक माहितीनुसार, या धक्क्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाली नाही, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

भंडारा जिल्ह्यासह नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली या चार जिल्ह्यांची जीवनवाहिनी ठरणारं गोसेखुर्द धरण शंभर टक्के भरलं आहे. धरणाने २४५ पूर्णांक ५० मीटर ही निर्धारित पातळी गाठल्याने आगामी काळात पिण्याचं पाणी, शेती आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. मध्य प्रदेशातल्या पावसामुळे वैनगंगा नदीचा प्रवाह सुरू राहिल्यानं धरणातल्या पाणीसाठ्यात वाढ झाली. दुष्काळी परिस्थितीमुळे राज्यातल्या अनेक भागांत पाणीकपातीचं संकट गडद होत असताना पूर्व विदर्भासाठी ही एक दिलासादायक बाब आहे.

****

सांगलीत पाचव्या महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस मानांकन स्पर्धेचं उद्घाटन काल झालं. महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनच्या मान्यतेनं सुरज फाउंडेशन आणि सांगली जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांनी संयुक्तपणे या स्पर्धेचं आयोजन केलं आहे. या स्पर्धेसाठी राज्यातल्या विविध जिल्ह्यांमधून ७०० खेळाडू सहभागी झाले आहेत.

****

७९ व्या वार्षिक निरंकारी संत संमेलनादरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड – पानिपत – नांदेड दरम्यान विशेष रेल्वे चालवण्याचा निर्णय घेतला आहे. नांदेड – पानिपत विशेष ही गाडी २१ आणि २७ ऑक्टोबर रोजी, तर परतीच्या प्रवासात ही गाडी २२ आणि २८ ऑक्टोबर रोजी धावणार आहे.

****